अतिरिक्त आयुक्त (जनरल) कार्यालय
पुणे महानगरपालिका

मा. अति. महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका.
ठराव क्र. :- १/९५
दिनांक :- ०६/०५/२०२१

अति. महापालिका आयुक्त (ज) कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे-५.
जा.क्र. :- अतिमआ/उआ/आस्था/१४०१
दिनांक :- १६/०५/२०२१

-आज्ञापत्र-

विषय :- सेवेत असताना मयत झालेल्या सेवकांच्या वारसास अनुकंपा तत्वाने मनपा सेवेत घेणेबाबत.
संदर्भ :- १) १. शासन निर्णय क्र. अकंपा१२१७/प्र.क्र.१०२/आठ, दिनांक २१/९/२०१७
२) मा. अति. महा. आयुक्त (ज.) ठ. क्र. १/९५, दि. ०६/०५/२०२१

मनपा सेवेत असताना सेवक मयत झाल्यास अशा सेवकांच्या कुटुंबियांचे हाल होवू नये म्हणून त्यांच्या वारसास काही अटींवर सेवानिवड या कक्षेतून वगळून अग्रक्रमाने मनपा सेवेत अनुकंपा तत्वावर घेण्याबाबतचे धोरण मनपा प्रशासनाने निश्चित केले आहे.

खालील उमेदवार हे सेवेत असताना मयत झालेल्या सेवकांचे वारस आहेत. त्यांची **लिपिक टंकलेखक (वर्ग-३)** (वेतनश्रेणी रु. ५२०० ते २०२००+ ग्रेड पे १९००+ मान्य भत्ते) या हुद्द्यावर शेड्युलमान्य रिकाम्या जागेवर नेमणूक करणेस मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) यांची मान्यता प्राप्त झालेली आहे.

वारस नेमणुकीबाबत खालील दर्शविल्याप्रमाणे **लिपिक टंकलेखक** या त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या (वेतनश्रेणी रु. ५२०० ते २०२००+ ग्रेड पे १९००+ मान्य भत्ते) च्या रिकाम्या जागेवर आज्ञापत्रकाचे दिनांकापासून अगर प्रत्यक्ष हजर होतील त्या दिनांकापासून खालील उमेदवारांची शेड्युलमान्य रिकाम्या जागेवर हंगामी नेमणूक करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सेवकाचे नाव व पत्ता | नेमणूक खाते व हुद्दा | तपशील |
|---|---|---|---|
| १. | **श्री.रोशन सुभाष जाधव** (विजाअ)<br>पत्ता :- ६/२३७ पी.एम.सी.कॉलनी, राजेद्रनगर,पुणे-३०<br><br>प्रशासन अधिकारी<br>आस्थापना विभाग<br>पुणे महानगरपालिका | मुख्य लेखा व वित्त विभाग<br>कार्यालय<br>हुद्दा :- लिपिक टंकलेखक (वर्ग-३) | पुणे महानगरपालिकेच्या कसबा-विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालयाकडील सेवक **कै.सुभाष शंकर जाधव** हुद्दा :-बिगारी यांचे दि. ०२/१२/२०२० रोजी सेवेत असताना निधन झाले आहे. त्यांचा वारस मुलगा **श्री.रोशन सुभाष जाधव** यांची अनुकंपा तत्वाने लिपिक टंकलेखक (पे. बँन्ड. रु. ५२००-२०२००+ ग्रेड पे १९०० + मान्य भत्ते) या हुद्द्यावर हंगामी नेमणूक मान्य. |

१) वरील उमेदवारास मनपा सेवाविनिमयानुसार संबंधित खात्याने वेतन व भत्ते अदा करण्यात यावे.

२) वरील उमेदवाराची नेमणूक पूर्णपणे हंगामी स्वरुपाची असून सेवानियम १० (अ) नुसार परीविक्षाधीन पद्धतीने करण्यात येत आहे. परीविक्षाधीनतेचा २ वर्षाचा कालावधी संपण्यापूर्वी २ महिने अगोदर सदर उमेदवारांची नेमणूक पुढे चालू ठेवणे विषयीचा अभिप्राय संबंधित मा. खातेप्रमुख यांनी आमच्याकडे पाठविणे आवश्यक आहे. वरील उमेदवाराचे काम समाधानकारक न झाल्यास अगर कामावरील हजेरी अनियमित असल्यास तसेच दाखल केलेली माहिती व कागदपत्रे यामध्ये तफावत आढळून आल्यास वरील उमेदवारास कोणतीही पूर्वसूचना (नोटीस) न देता केव्हाही कोणत्याही वेळी मनपा सेवेतून कमी करण्यात येईल.

३) वरील उमेदवाराने नेमणूकीच्या खात्याकडे रुजू होतेवेळी नियमानुसार सेवा अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे.

४) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. अंनियो १००५/१२६/सेवा-४ मंत्रालय, मुंबई-३२, दि. ३१/१०/२००५ नुसार सेवेत दि. ०१/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन ऐवजी पारिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात येईल.

५) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. एसआर व्हि- २०००/प्र.क्र. १७/२०००/१२, दि.०१/०७/२००५ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम-२००५ मधील प्रतिज्ञापत्राच्या नमुना-अ नुसार तो उमेदवाराने नेमणुकीच्या खात्याकडे रुजू होताना भरून देणे बंधनकारक आहे. त्याशिवाय उमेदवारास संबंधित खात्याने हजर करून घेवू नये.

६) महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक : चारित्र्य-२११७/प्र.क्र.४८३/२०१७/१६-अ, दि. २८/०८/२०१७ चे शासन निर्णयाचे अनुषंगाने त्याच्याविरुध्द कोणतेही गुन्हे नोंदविणेत आले नाहीत अथवा गुन्हा सिद्ध झालेला नाही, असे पोलिस चारित्र्य प्रमाणपत्र दि.०५/०१/२०२१ रोजी प्राप्त झाले आहे.

७) मनपा सेवाविनियम व सेवावर्तणूक नियमांचे पालन करणेबाबतच्या सूचना संबंधित मा. खातेप्रमुख यांनी सदर उमेदवारास देणेची तजविज करावी.

८) संबंधित उमेदवाराने मे. राज्य शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. अकंपा-१०१४, प्र.क्र. १६४/आठ, दि. २०/०५/२०१५ नुसार "अनुकंपा तत्वावर लिपिक टंकलेखक पदावर नियुक्त झालेल्या उमेदवारांना विहित वेगमर्यादेचे टंकलेखन अर्हता प्रमाणपत्र (मराठी टंकलेखनाची ३० श.प्र.मी. किंवा ४० श.प्र.मी.) प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यासाठी २ वर्षाची मुदत पुढील अटीच्या अधिनस्त देण्यात येत आहे."

९) महाराष्ट्र शासन निर्णय क्र. अकंपा१२१७/प्र.क्र.१०२/आठ, दिनांक २१/०९/२०१७ अन्वये संबंधित उमेदवाराने हजर झालेल्या दिनांकापासून २ वर्षाच्या आत शासनाची संगणक विषयक एम.एस.सी.आय.टी. परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. सदर परीक्षा विहित मुदतीत उत्तीर्ण न झाल्यास त्याची नेमणूक संपुष्टात आणण्यात येईल.

१०)मे.शासन निर्णय क्र. बीसीसी- २०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दि. १२ डिसेंबर २०११ अन्वये वरील आज्ञापत्रामधील ज्या सेवकांची निवड विशिष्ट मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झाली आहे. अशा सेवकांची त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती करण्यात आली आहे.

ज्या सेवकांची निवड विशिष्ट मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झाली आहे, अशा सेवकांनी नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ६ (सहा) महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता सादर करणे बंधनकारक आहे. मागासवर्गीय सेवकांनी नियुक्ती करताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव संबंधित जात वैधता समितीकडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेली पोचपावतीची साक्षांकित प्रत आस्थापना कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे. जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर संबंधित सेवकाचे नियुक्ती आदेश त्वरित रद्द करण्यात येतील.

११)संबंधित उमेदवार हे महानगरपालिकेच्या सेवेत नियुक्ती केल्यानंतर पुणे महानगरपालिकेच्या अधिनस्त कोणत्याही कार्यालयात बदली योग्य राहतील.

१२)संबधित उमेदवारांनी संबंधित खात्यात नेमणूक केल्यानंतर त्यांनी सदर खात्यात हजर व्हायचे आहे व त्या खात्यात संबंधित उमेदवाराने सेवाप्रवेश करताना जन्मतारखेबाबत उतारा/दाखला हजर करणे आवश्यक आहे. ज्या उमेदवाराकडे अशा प्रकारे दाखला नसेल त्यांच्याबाबतीत शाळा सोडल्याचा दाखला, शालांत परीक्षेचे प्रमाणपत्र यामध्ये नमूद केलेली जन्मतारीख ग्राह्य धरण्यात येईल. परंतु अशा उमेदवारांची भविष्यात जन्मतारीख बदलण्याची विनंती मान्य करता येणार नाही. याबाबतची स्पष्ट कल्पना संबंधित उमेदवार यांस देण्यात यावी. तद्नंतर काही कायदेशीर बाब निर्माण झाल्यास त्यास संबंधित खाते जबाबदार राहील.

१३)वरील उमेदवाराने नेमणूकीचे खात्यात/ विभागात हजर होण्यापूर्वी जन्म दिनांकाबाबत जरूर ती पुराव्याची कागदपत्रे संबंधित मा. प्रशासन अधिकारी यांना दाखवावीत व त्यांच्याकडून मा. आरोग्य अधिकारी, पुणे मनपा यांचे नावे शारीरिक तपासणी करून घेण्यासाठी पत्र घ्यावे, मा. आरोग्य अधिकारी यांचेकडून पूर्वनियोजित वेळेनुसार शारीरिक तपासणी करून घ्यावी व शारीरिक पात्रतेचा दाखला प्राप्त करून घ्यावा, असा दाखला असल्याशिवाय संबंधित उमेदवाराला खातेप्रमुखांनी कामावर हजर करून घेऊ नये.

१४)वरील उमेदवाराने सदर आज्ञापत्राचे दिनांकापासून एक महिन्याचे आत नेमणुकीचे विभागात हजर होणे बंधनकारक आहे. वरील उमेदवारास मनपा सेवेचा राजीनामा दयावयाचा झाल्यास त्यांनी मनपास १ महिन्याची पूर्वसूचना (नोटीस) देणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे पूर्तता न केल्यास १ महिन्याच्या पूर्वसूचनेकरिता आवश्यक असलेल्या मुदतीचा सर्व भत्त्यांसह पगार त्याच्याकडून वसूल करण्यात येईल.

१५)पुणे महानगरपालिका सेवाभरती नियम, २०१४ नुसार नियुक्ती कर्मचाऱ्यांनी त्यांची नियुक्ती झाल्याच्या दिनांकापासून ४ वर्षात ३ संधीमध्ये विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

१६)वरील उमेदवार यांनी नेमणुकीचे संदर्भात जात, शैक्षणिक पात्रता, जन्म दिनांक, अनुभव,इ. बाबत सादर केलेली माहिती केव्हाही असत्य आढळून आल्यास त्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता सेवेतून कमी करण्यात येईल.

१७)मा. प्रशासन अधिकारी यांनी सदर आज्ञापत्रात नमूद केलेल्या बाबींची वरील उमेदवारास समज देवून त्याची समज मिळाल्याबाबत आज्ञापत्राचे एका प्रतीवर स्वाक्षरी घ्यावी व त्याप्रमाणे इकडे निवेदन पाठवावे.

तरी वरील बाबींची संबंधित उमेदवाराने जरूर ती तजविज करावी.

कळावे.

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत:-

३. वरील उमेदवार- श्री.रोशन सुभाष जाधव

४. प्रत:- संबंधित मा. खातेप्रमुख/विभागप्रमुख
पुणे मनपा., यांजकडे माहितीसाठी व तजविजीसाठी रवाना.